# जिल्हा परिषद शाळा विक्रमगड येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**नवरंग मित्र मंडळ, विक्रमगड तालुका मेडीकल स्टोअर्स असोसिएशन, पालघर जिल्हा केमिस्ट असोसिएशन व रोटरी क्लब मनोर हायवे यांचा पुढाकार**



विक्रमगड/प्रशांत वाघाड :

डॉक्टर म्हटले की त्यांना देवाचे स्थान संबोधले जाते. कारण जग हे आजारी पडले की डॉक्टरांचा सल्ला घेतात. जे पण आजार झाले असतील ते मोठ्या प्रमाणात डॉक्टरांच्या सल्ल्याने बरे होतात आणि कधी कधी हे जग जीव जाण्याच्या परिस्थितीमधून वाचवले जातात म्हणून डॉक्टरांना देवाचे स्थान दिले जाते. त्याचप्रमाणे तसेच मेडीकल स्टोअरमधील कार्यरत फार्मासिस्ट हे सुध्दा मोलाचे कार्य करत असतात. आणि म्हणूनच नवरंग मित्र मंडळ यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करून मोठ्या प्रमाणात रुग्णांना ६ ऑक्टोबर २०२४ रोजी जि. प. प्राथमिक मराठी शाळा विक्रमगड येथे नवरंग मित्र मंडळ सार्वजनिक नवरात्र उत्सव २०२४ यांच्या अनुषंगाने अध्यक्ष व श्री वैभव विनायक पडवळे यांच्या अध्यक्षतेखाली मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये रोटरी क्लब मनोर हायवे अध्यक्ष रो. डॉ. कद्रा पावडे, सेक्रेटरी रो. संजय म्हात्रे, रो. सायमा मोमीन, डॉक्टर टीम डॉ. निकिता, डॉ. अक्षय कुमार, डॉ. सुरुची गायकवाड, डॉ. अक्षय वाडकर यांनी रुग्णांना मोफत आरोग्य तपासणी करून आणि मोलाचे मार्गदर्शन करून त्यांना सेवा दिली. आणि तसेच विक्रमगड तालुका मेडीकल स्टोअर्स असोसिएशनचे अध्यक्ष औषध विक्रेता श्री. योगेश भानुशाली सतीश ठेकार (खजिनदार) केमिस्ट असोसिएशन पालघर जिल्हा, विक्रमगड तालुका मेडिकल स्टोअर्स असोसिएशनचे सचिव विजय पाटील, खजिनदार साईनाथ पाटील, ओम साई गांव माझी शाळा या पुढ पत्राचे पत्रकार/औषध निर्माता प्रशांत सुरुवात यांनी उपस्थित राहून मोफत औषधांची सेवा दिली. या ठिकाणी प्रमुख अतिथी म्हणून विक्रमगड तालुका तहसिलदार कार्यालयाच्या तहसिलदार भाग्यश्री पवार यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.